मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्रशासकीय काळातील खर्चिक कामांचा फटका

## दायित्व वाढल्याने नवनिर्वाचित नगरसेवकांना विकासकामांसाठी किमान दोन वर्षांची प्रतीक्षा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या तब्बल वर्षांच्या कार्यकाळात प्रमाणात मोठी व खर्चिक कामे करण्यात आली आहेत. खर्चिक आणि भांडवली विकासकामांमुळे तब्बल हजार कोटी रुपयांचे दायित्व झाले आहे. परिणामी, नवनिर्वाचित नगरसेवकांना किमान दोन वर्षे प्रभागातील विकासकामांसाठी प्रतीक्षा करावी लागेल, अशी महापालिकेची परिस्थिती आहे.




कोरोना महामारी, ओबीसी आरक्षणाचा वाद, न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांमुळे महापालिकेची निवडणूक वेळेत होऊ शकली नाही. मार्च ला महापालिका बरखास्त झाल्यानंतर मार्चपासून प्रशासक म्हणून कारभार हाती घेतला. या कालावधीत मोठ्या खर्चिक प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. सलग चार वर्षे प्रशासकीय राजवटीत असताना मोठ्या प्रकल्पांना सरसकट मंजुरी देण्यात आली आहे.. अनेक कामे अद्याप सुरू असून, त्यासाठी महापालिकेचा मोठा निधी आधीच खर्च झाला आहे. त्यामुळे महापालिकेची आर्थिक स्थिती सध्या मर्यादित आहे.

लोकप्रतिनिधींच्या सुरुवातीलाच नवीन कामांना ब्रेक लागण्याची चिन्हे आहेत. प्रशासकीय राजवटीत सुरू असलेल्या प्रकल्पांमुळे नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना भूमिका लागणार आहे. ठेवी असून, कर्जाचे प्रमाण वाढले आहे. मोठा भार, मर्यादित साधनांमुळे महापालिका आर्थिक विवंचनेत आहे. त्यामुळे निवडणुकीत दिलेल्या अनेक पदाधिकाऱ्यांना प्रत्यक्षात लागणार आहे.

कासारवाडी-नाशिक फाटा दुमजली उड्डाणपुलासाठी १६० कोटी रुपयांचे जागतिक बँकेचे कर्ज अद्याप फेडले जात आहे. मुळा नदी सुधार प्रकल्पासाठी २०० कोटींचे म्युन्सिपल बॉण्ड, तर हरित सेतू प्रकल्पासाठी २०० कोटींचे ग्रीन बॉण्ड उभारण्यात आले आहेत. मोशी रुग्णालयासाठी ५५० कोटी रुपयांचे कर्ज घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. ड्रेनेजलाईन, एसटीपी विस्तार, मोशी वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प, पवना बंद जलवाहिनी, हरित सेतू आणि पवना-मुळा-इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांसाठी तब्बल सात हजार कोटी रुपयांचे कर्ज उभारण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर करण्यात आला आहे.

### कर्जाचा वाढता डोंगर


» कासारवाडी-नाशिक फाटा दुमजली उड्डाणपुलासाठी १६० कोटी रुपयांचे जागतिक बँकेचे कर्ज अद्याप फेडले जात आहे. मुळा नदी सुधार प्रकल्पासाठी २०० कोटींचे म्युन्सिपल बॉण्ड, तर हरित सेतू प्रकल्पासाठी २०० कोटींचे ग्रीन बॉण्ड उभारण्यात आले आहेत. मोशी रुग्णालयासाठी ५५० कोटी रुपयांचे कर्ज घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. ड्रेनेजलाईन, एसटीपी विस्तार, मोशी वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प, पवना बंद जलवाहिनी, हरित सेतू आणि पवना-मुळा-इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांसाठी तब्बल सात हजार कोटी रुपयांचे कर्ज उभारण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर करण्यात आला आहे.वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प, पवना बंद जलवाहिनी, हरित सेतू आणि पवना-मुळा-इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांसाठी तब्बल सात हजार कोटी रुपयांचे कर्ज उभारण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर करण्यात आला आहे.

# ई-गव्हर्नन्स सुधारणा उपक्रमात पीएमआरडीए राज्यात अव्वल

## 100 दिवसांच्या कृती आराखड्यात उत्कृष्ट कामगिरी; पुणे विभागात प्रथम क्रमांक

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अव्वल ठरले आहे. सर्व शासकीय कार्यालयांची कामगिरी भारतीय गुणवत्ता परिषद यांच्या वतीने अंतिम तपासले. यात कामगिरी करणाऱ्या पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) शासकीय संस्था, मंडळे व कंपन्या या गटातून राज्यात क्रमांक पटकावला आहे, तर पुणे विभागात प्रथम क्रमांक मिळवला.




कार्यालयाची अधिकृत 'आपले प्रणाली, कार्यालयीन कृत्रिम ब्लॉकचेन तसेच माहिती प्रणाली यांचा शासकीय प्रभावी वापर करून ही निवड करण्यात आली आहे. मुख्यमंत्री कार्यालयाकडून दिवसांचा प्रशासकीय सुधारणा व धोरणात्मक आधारित कार्यक्रम जाहीर केला होता. त्या स्पर्धेतही पीएमआरडीएने राज्यात क्रमांक पटकावला होता.

आता जून मध्ये दिवसांचा ई-गव्हर्नन्स कृती आराखडा घोषित केला गेला. या आराखड्यांतर्गत राज्यातील शासकीय दहा विविध करण्यात आले. यात सुधारणा प्रक्रियेमुळे कार्यालयीन कामकाज अधिक गतिमान झाले असून, नागरिकांना सुलभ व वेळेत सेवा मिळण्यास मोठी मदत झाली आहे.

### १०० दिवस उपक्रमातही छाप

» मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी १०० दिवसांचा प्रशासकीय सुधारणा व धोरणात्मक निर्णयांवर आधारित कार्यक्रम जाहीर केला होता. त्या स्पर्धेतही पीएमआरडीएने छाप पाडत राज्यात तृतीय क्रमांक पटकावला.

> “ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून पारदर्शक, गतिमान आणि नागरिकाभिमुख प्रशासन घडविण्याचा आमचा प्रयत्न आहे. पीएमआरडीएच्या प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याच्या संघभावनेतून आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून हे यश मिळाले आहे.
>
> - डॉ. योगेश म्हसे, पीएमआरडीए

# महाराष्ट्राने एक अनुभवी, कर्तृत्ववान आणि विकासाभिमुख नेता गमावला : खासदार श्रीरंग बारणे

## राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक अनुभवी, कर्तृत्ववान आणि विकासाभिमुख नेता गमावला असल्याची भावना खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केली आहे. अजितदादा पवार हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. कामाप्रती प्रचंड निष्ठा असलेले नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. राज्यातील विविध विकासकामांच्या जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा राहिला असल्याचे बारणे यांनी सांगितले.



खासदार श्रीरंग बारणे यांनी म्हटले आहे की, अजितदादा पवार यांच्या संसदीय राजकारणाची सुरुवात पिंपरी-चिंचवड परिसरातून झाली होती. पिंपरी-चिंचवडचा समावेश असलेल्या बारामती मतदारसंघातून त्यांनी १९९१ मध्ये लोकसभेची निवडणूक लढवली होती. त्या काळापासून त्यांचे पिंपरी-चिंचवड शहराशी अतूट नाते निर्माण झाले होते. एकत्र काँग्रेस पक्षात असताना अजितदादा पवार यांच्यासोबत जवळून काम करण्याची संधी मिळाल्याचे खासदार बारणे यांनी नमूद केले. नेता म्हणून त्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून त्यांच्या सहवासातून राजकारणातील अनेक बारकावे शिकता आले, असेही त्यांनी सांगितले.

सर्वसामान्य कुटुंबातील अनेक कार्यकर्त्यांना घडवून मोठे करण्याचे काम अजितदादा पवार यांनी केले. स्पष्ट वक्ता, निर्भिड आणि रोखठोक भूमिका हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. "जे पोटात तेच ओठावर" ही त्यांची ओळख होती. पिंपरी-चिंचवड शहरावर अजितदादा पवार यांचे विशेष प्रेम होते. नियोजनबद्ध विकासाच्या माध्यमातून त्यांनी शहराला वेगळ्या उंचीवर नेले. शहराचा सर्वांगीण विकास करताना त्यांनी जागतिक पातळीवर शहराची ओळख निर्माण करण्यासाठी मोठे योगदान दिले.

अजितदादा पवार यांच्या अकाली निधनामुळे पिंपरी-चिंचवड शहर पोरके झाले असून राज्याचेही मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या निधनाने पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, त्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असे भावनिक शब्दांत खासदार श्रीरंग बारणे यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक अनुभवी, कर्तृत्ववान आणि विकासाभिमुख नेता गमावला असल्याची भावना खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केली आहे. सर्वसामान्य कुटुंबातील अनेक कार्यकर्त्यांना घडवून मोठे करण्याचे काम अजितदादा पवार यांनी केले. स्पष्ट वक्ता, निर्भिड आणि रोखठोक भूमिका हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. "जे पोटात तेच ओठावर" ही त्यांची ओळख होती.

# अजितदादांसारखा धडाडीचा आणि कामाचा आवाका असणारा नेता पुन्हा होणे नाही

## अशी भावना भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख अजित पवार यांचा (ता. 28 जानेवारी) सकाळी बारामतीजवळ विमान अपघातात अकाली मृत्यू झाला आहे.

मुंबईहून बारामतीकडे येणाऱ्या खासगी चार्टर्ड विमानाच्या लँडिंगदरम्यान नियंत्रण सुटल्याने ते शेतात कोसळले आणि भीषण आग लागली. या अपघातात अजित पवारांसह विमानातील इतर सर्व पाच जणांचा मृत्यू झाला आहे. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. विविध राजकीय नेते अजित पवारांच्या आठवणींना उजाळा देताना भावूक होत असल्याचे दिसून येत आहे. भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी देखील याबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.



> राज्याच्या जडणघडणीत त्यांनी दिलेलं योगदान हा महाराष्ट्र कायम स्मरणात ठेवील. दादांचं अकाली जाणं हे त्यांच्या कुटुंबासह सर्व कार्यकर्त्यांसाठी मोठा धक्का आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. या दुःखद प्रसंगी पवार कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, ही परमेश्वरचरणी प्रार्थना करतो.महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली..!
>
> - महेश किसनराव लांडगे
> आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड पुणे.

महेश लांडगे म्हणाले, राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आज सकाळी झालेल्या विमान अपघातात दुःखद निधन झाले. त्यांच्या अकाली निधनाची बातमी अत्यंत दुःखदायक आणि अतिशय धक्कादायक आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

अजितदादांसारखा धडाडीचा आणि कामाचा आवाका असणारा नेता पुन्हा होणे नाही. त्यांच्या जाण्याने एक लोकाभिमुख व करारी नेतृत्व हरपलं आहे. जनतेच्या प्रश्नांसाठी पहाटे सहापासून तळमळीनं काम करणारे ते खरे लोकसेवक होते.

# "हा निव्वळ अपघात, यात कोणीही राजकारण आणू नये": शरद पवारांची प्रतिक्रिया

## अजित पवारांच्या अपघाती मृत्यूवर प्रतिक्रिया देताना शरद पवारांना अश्रू अनावर

**पिंपरी | प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं विमान अपघातात निधन झालं आहे. (२८ जानेवारी) सकाळी ही घटना घडली आहे. अजित पवार हे एका खासगी विमानाने मुंबईवरून बारामतीला येत होते. यावेळी विमानाचं लँडिंग होत असताना विमानाचा अपघात झाला आणि या अपघातात अजित पवार यांच्यासह सहा जणांचा मृत्यू झाला आहे.

अजित पवारांच्या अपघाती मृत्यूवर प्रतिक्रिया देताना शरद पवारांना देखील अश्रू अनावर झाले होते. "हा निव्वळ अपघात असून यात कोणीही राजकारण आणू नये", अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली आहे.

"अजित पवार यांचा अपघाती मृत्यू हा महाराष्ट्राला प्रचंड मोठा धक्का आहे. एक कर्तृत्ववान आणि निर्णय घेण्याची शक्ती ज्यांच्यात आहे, अशा व्यक्तीला महाराष्ट्र आज मुकला आहे. जे काही नुकसान झालंय ते भरून निघणारं नाही, पण सगळ्याच गोष्टी काही आपल्या हातात नसतात", असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.



### अपघातात अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू

» बारामतीत झालेल्या विमान अपघातात अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये अजित पवारांसह मुंबई पीएसओ HC विदीप जाधव, पायलट कॅप्टन सुमित कपूर, कॅप्टन शांभवी पाठक, फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी यांचा समावेश आहे. या सर्वांचा या अपघातात मृत्यू झाला आहे. मुंबईतून हे विमान सकाळी ८ वाजून १० मिनिटांनी निघाले होते. तर, बारामती येथे ८.५० मिनिटांनी पोहोचले. लँडिंग करत असतानाच या विमानाचा अपघात झाला अन् आतील प्रवाशांचा मृत्यू झाला.

"मी आज मीडियासमोर येणार नव्हतो, पण काही माध्यमांमध्ये ह्या अपघातामागे काही राजकारण आहे अशा प्रकारची भूमिका कलकत्त्यावरून मांडली गेली असं कळलं. पण यात राजकारण नाही, हा निव्वळ अपघात आहे. अजित पवारांच्या अपघाती मृत्यूच्या यातना महाराष्ट्राला आणि आम्हा सगळ्यांना आहेत. कृपया यात राजकारण आणू नये, एवढंच सांगायचं आहे", असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

# महापालिकेत दुचाकी वाहनांना बंदी ? प्रशासनाच्या निर्णयाने नागरिक हैराण...

## 1 जानेवारी ते 31 डिसेंबर 2025 दरम्यान 53 हजार नागरिकांवर कारवाई; सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्यांची संख्या वाढली.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेत वाढत असलेली वाहनांची संख्या लक्षात घेऊन त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका भवनाच्या आवारात दुचाकींना प्रवेश न देता केवळ चारचाकी वाहनांना प्रवेश देण्याचा प्रयोग राबविण्यास महापालिका प्रशासनाने सुरुवात केली आहे. यामुळे महापालिकेत कामानिमित्त आलेल्या सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय झाली. दुचाकी वाहने आत सोडली जात नसल्याने अनेक नागरिकांनी मुख्य इमारतीसमोरील रस्त्याच्या कडेला वाहने लावली. मात्र, त्यावर वाहतूक पोलिसांकडून कारवाई केली जात असल्याने नागरिकांना अधिकच त्रासाला सामोरे जावे लागले.

महापालिकेत चार वर्षांच्या प्रशासकराजनंतर आता लोकप्रतिनिधी निवडून आले आहेत. महापालिकेत १६५ नगरसेवक निवडून आले असून कामानिमित्त त्यांच्याबरोबर महापालिकेत येणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्याही वाढणार आहे. महापालिकेचे मुख्य सभागृह सुरू झाल्यानंतर महापालिकेत येणाऱ्यांची संख्याही वाढतच जाणार आहे. त्याचा थेट परिणाम वाहनांच्या पार्किंगवर होणार आहे.

पार्किंगचा गंभीर होत असलेला प्रश्न सोडविण्यासाठी मुख्य इमारतीच्या आवारात आता कोणत्याही दुचाकी वाहनांना प्रवेश न देता केवळ चारचाकी वाहनांना पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून देण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. सध्या प्रायोगिक तत्वावर याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

महापालिका भवनाच्या नवीन इमारतीतील तळघर व दोन्ही इमारतींच्या मधील जागेत होणारे दुचाकी पार्किंग बंद केले आहे. त्यामुळे या परिसरात दररोज उभ्या करण्यात येणाऱ्या ५०० दुचाकींपैकी ३०० दुचाकींच्या पार्किंगचा प्रश्न निर्माण झाला आहे. महापालिका प्रशासनाने मंगळवारपासून याची अंमलबजावणी सुरू करून दुचाकींना प्रवेश नाकारण्यास सुरुवात केली. यामुळे वाहनचालक आणि महापालिकेचे सुरक्षा कर्मचाऱ्यांमध्ये जोरदार खटके उडल्याचे चित्र पाहायला मिळाले




### दुचाकींना प्रवेश नाकारण्यास सुरुवात

**» महापालिका प्रशासनाने मंगळवारपासून याची अंमलबजावणी सुरू करून दुचाकींना प्रवेश नाकारण्यास सुरुवात केली. यामुळे वाहनचालक आणि महापालिकेचे सुरक्षा कर्मचाऱ्यांमध्ये जोरदार खटके उडल्याचे चित्र पाहायला मिळाले. प्रशासनाने हा बदल करताना नवीन इमारतीतील तळमजल्यापैकी पहिल्या मजल्यावरील दुचाकीचे पार्किंग तसेच जुन्या व नवीन इमारतीच्या मध्यभागी असलेल्या मोकळ्या जागेत दुचाकी लावण्यास मनाई केली. तसेच, जुन्या इमारतीतील दुचाकीचे ओपन पार्किंग केवळ महापालिकेतील महिला कर्मचाऱ्यांसाठी आरक्षित केले आहे. यालगत असलेल्या दुमजली पार्किंगमधील सर्वांत वरचे पार्किंग हे सर्वसामान्य नागरिकांसाठी राखीव ठेवले आहे.**

### उपाययोजना महापालिकेकडून करण्यात येणार

**» याबाबत महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांना विचारले असता ते म्हणाले, 'महापालिका भवनच्या आवारातील वाहनांच्या पार्किंगबाबत प्रशासन गांभीर्याने विचार करत आहे. महापालिकेचे सभागृह सुरू झाल्यानंतर अनेक अडचणी समोर येणार आहेत. महापालिकेत येणारी वाहने आणि त्यासाठी आवश्यक असलेले पार्किंग ही बिकट समस्या आहे. यासाठी आवश्यक त्या उपाययोजना महापालिकेकडून करण्यात येणार आहेत.**

### पार्किंग सुविधेस प्राधान्य

**» महापालिका कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी बससेवा सुरू करण्याबाबतही विचार सुरू आहे. तसेच, मेट्रो मार्गावरील कर्मचाऱ्यांना मेट्रोने महापालिका भवन येथे ड्युटीसाठी येण्यासाठी आवाहन करण्याचा प्रशासनाचा विचार आहे. महापालिकेत कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांच्या पार्किंग सुविधेस प्राधान्य देण्याकरिता प्रशासन सर्व शक्यता तपासून नियोजन करण्याचा प्रयत्न करेल.**

# शहरातील बहुतांश भागात पाणीपुरवठा राहणार बंद

## गुरुवारी रात्री 11 वाजल्यापासून ते शुक्रवार, 30 फेब्रुवारी रोजी रात्री 11 वाजेपर्यंत शहरातील मोठ्या भागात पूर्ण दिवस पाणीपुरवठा बंद राहणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून गुरुवार, २९ फेब्रुवारी रोजी शहरातील विविध जलशुद्धीकरण केंद्रे, टाक्या व पंपिंग केंद्रांमध्ये तातडीची विद्युत व पंपिंग विषयक दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. त्यामुळे गुरुवारी रात्री ११ वाजल्यापासून ते शुक्रवार, ३० फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजेपर्यंत शहरातील मोठ्या भागात पूर्ण दिवस पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तसेच शुक्रवारी सकाळी पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतरही अनेक भागांत कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

पर्वती नवीन व जुने जलशुद्धीकरण केंद्र, त्याअंतर्गत येणाऱ्या पर्वती एमएलआर, एचएलआर व एलएलआर टाक्या, पर्वती टँक पॉइंट, वडगाव जलशुद्धीकरण केंद्र, राजीव गांधी पंपिंग स्टेशन, लष्कर, चिंचवली, वारजे जलकेंद्र तसेच वडगाव जलकेंद्राशी संबंधित विविध टाक्या व पंपिंग व्यवस्थेची देखभाल व दुरुस्ती करण्यात येणार आहे. या कामासाठी विद्युत पुरवठा आणि पंपिंग यंत्रणा तात्पुरती बंद ठेवावी लागणार असल्याने पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे.

पर्वती एलएलआर टाकी अंतर्गत शहरातील सर्व पेठा, दत्तवाडी, राजेंद्रनगर, लोकमान्य नगर, डेक्कन परिसर, शिवाजीनगर व स्वारगेट परिसरात पाणीपुरवठा होणार नाही. वडगाव जलकेंद्राशी संबंधित हिंगणे, आनंदनगर, धायरी, आंबेगाव पठार, धनकवडी, कात्रज, भारती विद्यापीठ परिसर, आंबेगाव खुर्द-बुद्रुक, येवलेवाडी, सहकारनगरचा काही भाग, टिळकनगर, दाते वसाहत आदी भाग प्रभावित होणार आहेत.



### पाणीपुरवठा राहणार बंद

**» महापालिकेच्या माहितीनुसार पर्वती एमएलआर टाकी परिसरातील गुरुवार पेठ, शुक्रवार पेठ, कसबा पेठ, कात्रज गेट, भवानी पेठ, नाना पेठ, लोहियानगर, सोमवारी पेठ, अर्जुन बेडे स्टेडियम परिसर, घोरपडे पेठ, पर्वती दर्शन, मुंढवा रोडचा काही भाग आदी भागांत पाणीपुरवठा बंद राहणार आहे. पर्वती एचएलआर टाकी परिसरात सहकारनगर, पद्मावती, बिबवेवाडी, मुकुंदनगर, चिंचवडनगरचे काही भाग, लोअर व अपर इंदिरानगर, शिवदर्शन, बिबवेवाडी गावठाण, औंधकरनगर, गंगाधाम, शेलार मळा, टिळक वसाहत, पर्वती गावठाण, मितानगर, कुमार पृथ्वी, कोंढवा खुर्दचे काही भाग अशा विस्तृत परिसराचा समावेश आहे.**

# सहकारातून सुरुवात ते उपमुख्यमंत्रीपदाचा विक्रम

## महाराष्ट्राच्या राजकारणात अजित पवार हे एक प्रभावी आणि निर्णायक नेतृत्व

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाले आहे. ते ६६ वर्षांचे होते. बुधवारी सकाळी ८.४५ वाजता बारामती येथे त्यांचे विमान कोसळले. प्राथमिक माहितीनुसार, बारामती विमानतळावर उतरताना हा अपघात झाला. अजित पवारांचा विमान अपघात पाहणाऱ्या प्रत्यक्षीदर्शी महिला म्हणतात, 'पहिल्यांदा उतरण्याचा प्रयत्न केला त्यानंतर हे विमान फिरून परत येत होतं. त्यावेळी ते खूप खाली खाली येत होतं. आम्ही बाहेरच होतो. धावपट्टीच्या वर जायच्या ऐवजी ते बाजूला क्रॅश झालं. क्रॅश झाल्यानंतर ते पलटी झालं अन् मोठा स्फोट झाला. ज्यावेळी ही घटना झाली त्यावेळी आम्ही बाहेरच होतो. पावणे नऊच्या आसपास ही घटना घडली. आम्ही खूप घाबरलो होतो. आमच्या घराच्या पाठीमागेच त्या विमानाचे पार्ट पडलेले.'

आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, अजित पवार मुंबईहून चार्टर्ड विमानाने बारामतीला गेले होते. तिथे उतरताना विमान धावपट्टीवरून घसरले. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) या अपघातात पाच जणांच्या मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे.

अजित पवारांचा विमान अपघात पाहणाऱ्या प्रत्यक्षीदर्शी महिला म्हणतात, 'पहिल्यांदा उतरण्याचा प्रयत्न केला त्यानंतर हे विमान फिरून परत येत होतं. त्यावेळी ते खूप खाली खाली येत होतं. आम्ही बाहेरच होतो. धावपट्टीच्या वर जायच्या ऐवजी ते बाजूला क्रॅश झालं. क्रॅश झाल्यानंतर ते पलटी झालं अन् मोठा स्फोट झाला. ज्यावेळी ही घटना झाली त्यावेळी आम्ही बाहेरच होतो. पावणे नऊच्या आसपास ही घटना घडली. आम्ही खूप घाबरलो होतो. आमच्या घराच्या पाठीमागेच त्या विमानाचे पार्ट पडलेले.'



### राजकीय प्रवासाची प्रमुख टप्पे

- १९९१: बारामती लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले. पण नंतर जागा शरद पवार यांच्यासाठी सोडली.
- त्याच वर्षी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष झाले (१६ वर्षे पद भूषवले).
- त्याच वर्षी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष झाले (१६ वर्षे पद भूषवले).
- २००४ पासून: राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (NCP) चे प्रमुख नेते म्हणून उदयास आले.
- उपमुख्यमंत्री पद: अजित पवार यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून अनेकदा (किमान ५-६ वेळा) शपथ घेतली आहे. हा एक विक्रम मानला जातो.
- २०१०-२०१४: प्रथमकाळ उपमुख्यमंत्री (काँग्रेस-NCP सरकार).
- २०१९: फक्त ८० तास उपमुख्यमंत्री (शिवसेना-NCP-काँग्रेस आघाडी).
- २०२३: पुन्हा उपमुख्यमंत्री (शरद पवार गटासोबत).
- डिसेंबर २०२४: महायुती सरकारमध्ये (देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री, एकनाथ शिंदे यांच्यासोबत उपमुख्यमंत्री) शपथ घेतली. एनडीएमध्ये सामील होऊन NCP ची मुख्य शाखा म्हणून मान्यता मिळवली
- विधानसभा: बारामती विधानसभा मतदारसंघातून अनेकदा आमदार म्हणून निवडून आले. २०२४-२०२५ मध्येही त्यांनी बारामतीतून विजय मिळवला

### जन्म आणि सुरुवातीचे जीवन

- जन्म: २२ जुलै १९५९, देवळाली प्रवरा, अहमदनगर जिल्हा, महाराष्ट्र.
- ते सहकारी क्षेत्रातून राजकारणात आले. १९८२ मध्ये सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर निवडून आले, ही त्यांची राजकीय कारकीर्दीची सुरुवात होती.

### प्रमुख योगदान आणि वैशिष्ट्ये

- जलसंसाधन, सिंचन, ग्रामीण विकास, वित्त आणि नियोजन खात्यांवर काम केले.
- ते "दादा" म्हणून ओळखले जातात आणि जनता दरबारद्वारे लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रसिद्ध आहेत.
- विकासकामांसाठी १६-१७ तास काम करणारे नेते म्हणून त्यांची ओळख आहे.
- महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्र, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि पाणी व्यवस्थापनात त्यांचा मोठा प्रभाव राहिला.

# अजित पवारांच्या निधनाने पिंपरखेड व बेट भागात कडकडीत बंद

## विमान अपघाताच्या धक्कादायक बातमीनंतर जिल्हा परिषद निवडणूक प्रचार थांबला, गावोगावी शोककळा

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धडाडीचे नेतृत्व आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले आहे.या धक्कादायक बातमीमुळे ऐन जिल्हा परिषद निवडणुकीचा प्रचार थांबवत बेट भागातील गावांमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला.संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली असताना राजकीय वर्तुळासह सर्वसामान्य जनतेतून मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.




राज्यात सध्या जिल्हा परिषद निवडणुकांचे वारे वाहत असून सर्वच पक्षांचे कार्यकर्ते प्रचारात व्यस्त होते.मात्र,अजित पवार यांच्या निधनाची बातमी धडकताच, आदर व्यक्त करत सर्व राजकीय पक्षांनी आपापल्या उमेदवारांचा निवडणूक प्रचार तत्काळ थांबवला आहे."एक कार्यक्षम प्रशासक आणि परखड व्यक्तीमत्व, राजकारणातील धुरंधर नेता हरपला," अशा भावना सर्व पक्षीय कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत होत्या.

बेट भागातील सर्वच गावांमध्ये या घटनेचे तीव्र पडसाद उमटले आहेत. बातमी समजताच ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने व्यवहार बंद ठेवले आहेत.अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दुकाने, बाजारपेठा आणि व्यवहार कडकडीत बंद ठेवण्यात आले आहेत.जांबुत येथील आठवडे बाजार बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.गावागावातील नागरिकांनी एकत्र येत अजित पवारांच्या दुर्दैवी मृत्यूबाबत हळहळ व्यक्त केली.बेट भागात अनेक सार्वजनिक ठिकाणी शुकशुकाट पाहायला मिळत आहे. अजित पवार हे त्यांच्या शिस्तीसाठी आणि कामाच्या धडाक्यासाठी ओळखले जात होते. पहाटेपासून कामाला सुरुवात करणारा हा लोकनेता अशा प्रकारे काळाच्या पडद्याआड गेल्याने प्रशासकीय आणि राजकीय पातळीवर कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. अजितदादांचे जाणे हा केवळ एका पक्षाचा नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राचा मोठा तोटा असल्याच्या भावना पिंपरखेडचे सरपंच राजेंद्र दाभाडे यांनी व्यक्त केली. त्यांच्या निधनाने राज्याच्या विकासाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ निखळल्याच्या भावना सर्वत्र व्यक्त होत आहेत.

### निवडणूक प्रचार तत्काळ थांबवला

- राज्यात सध्या जिल्हा परिषद निवडणुकांचे वारे वाहत असून सर्वच पक्षांचे कार्यकर्ते प्रचारात व्यस्त होते. मात्र, अजित पवार यांच्या निधनाची बातमी धडकताच, आदर व्यक्त करत सर्व राजकीय पक्षांनी आपापल्या उमेदवारांचा निवडणूक प्रचार तत्काळ थांबवला आहे. "एक कार्यक्षम प्रशासक आणि परखड व्यक्तीमत्व, राजकारणातील धुरंधर नेता हरपला," अशा भावना सर्व पक्षीय कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत होत्या.